# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

क्र. 1887/शि.वि. दि. 15/05/2014.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ / उच्च प्राथ. / माध्यमिक शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :– जीवन शिक्षण मासिकाचे वर्गणीदार करून घेणेबाबत.**

**संदर्भ :–** संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या परिषद) पूणे यांचे पत्र क्र. मराशैसंप्रप / जीशिप्र / 2013–14 / 135 दि. 06 / 05 / 2014.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिंय पत्रान्वये संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या परिषद) पूणे यांनी असे आदेशित केले आहे की, जीवन शिक्षण मासिकाला 150 वर्षाची गौरवशाली पंरपरा लाभली आहे. प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता विकास कार्यक्रमात महत्वाची भुमिका बजावणारे हे मासिक शालेय शिक्षण विभागाचे मुखपत्र म्हणून ओळखले जाते. शासनाच्या शासन निर्णय क्र. पी आर ई 2010 / (175 / 10)प्रा शि –5 (एस डी –/4) दि. 06 / 12 / 2013 नुसार जीवन शिक्षण मासिकाचे 100% शिक्षक वर्गणीदार करून दयावे असे सुचित केले आहे. त्यानुसार आपल्या शाळेतील 100% शिक्षकांना जीवन शिक्षण मासिकाचे वर्गणीदार करून हे मासिक आपल्या शाळेतसुध्दा सुरू करावे. आपल्या नियत्रंणाखाली असलेल्या सर्व शिक्षक हे वर्गणीदार झाल्याबाबत खात्री करावी तशी जबाबदारी मुख्याध्यापकांवर सोपविण्यात येत आहे. जीवन शिक्षण मासिक सुरू केल्याबाबत सत्यप्रत गोळा करून सर्व शाळांनी आपल्या झोनच्या शाळानिरीक्षकांकडे दि. 10 / 06 / 2014 पर्यंत सादर करावा.

**संपर्क पत्ता :–** संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
(विद्या परिषद) 708, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पूणे – 411030.
दुरध्वनी :– 24488382, फॅक्स : 24477090, 24481269
ई–मेल : jeevanshikshan123@gmail.com
Webside : wwww.mscert.org.in

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

PC:2/D:\Tembhurne sir \ Letter 1.doc